## राजपाल हांडे : दोडामार्ग महाविद्यालयात एक दिवसीय शिबिर

# व्यक्तिमत्त्व विकासातून समाज परिवर्तन

**कसई दोडामार्ग :** शिक्षण परिपूर्ण होण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालये कार्यरत आहेत. या प्रक्रियेत काही विद्यार्थी न्यूनगंडामुळे आत्मविश्वास गमावून बसतात. सुरवंटातून ते बाहेर पडत नाहीत. म्हणून सुरवंट्याचे फुलपाखरूमध्ये रुपांतर व्हावे, म्हणून विद्यापीठाने गेल्या चार वर्षांपासून 'मेटामॉर्फोसिस' हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण बाहेर काढावे व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा. जेणेकरून त्यांचा स्वाभिमान जागा होण्याबरोबरच व्यक्तिमत्व विकासही होईल. अशा युवकांचा समाज परिवर्तनासाठी उपयोग होईल हा या प्रकल्पामागील उद्देश आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या 'महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळा'चे संचालक प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी केले.

मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण मंडळ व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'मेटामॉर्फोसिस' या नाविन्यपूर्ण प्रकल्पाच्या एक दिवसीय शिबिराचे उद्घाटन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. यावेळी प्रकल्पाचे समन्वयक डॉ. प्रदीप कामथेकर, प्रा. डॉ. विनायक दळवी व कॅप्टन श्रीमती नीलिमा प्रभू व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी डॉ. हांडे 'मेटामॉर्फोसिस' अर्थात सुरवंटाचे फुलपाखरू या उपक्रमाचे उद्देश स्पष्ट करून म्हणाले, विद्यापीठाच्या योजना सर्वदूर पसरलेल्या ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्यापैकी 'मेटामॉर्फोसिस' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. 'मेटामॉर्फोसिस' म्हणजे परावर्तित होणे होय.

विद्यार्थ्यांमध्ये दडलेले गुण परावर्तित व्हावे व त्यांचा आविष्कार व्हावा, यासाठी हे नवे व्यासपीठ उपलब्ध होत आहे. या शिबिरातून मिळणाऱ्या ज्ञानाचा दैनंदिन वैयक्तिक जीवनामध्ये वापर करून नवनवीन ज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

दोडामार्गसारख्या दुर्गम आणि डोंगराळ भागात शिक्षणाची ज्ञान गंगा तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवी, या उदात्त हेतूने प्रेरित होऊन पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आमदार कपिल पाटील व अभिजीत हेगशेट्ये यांनी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे २००१ मध्ये येथे महाविद्यालय सुरु केले. तेव्हापासून आजतागायत महाविद्यालयाची वाटचाल यशस्वीपणे सुरू असल्याचे कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. पाटील यांनी सांगितले. तसेच कोणत्याही उपक्रमात भाग न घेणाऱ्या मुलांचे फुलपाखरू बनविण्यासाठी मेटामॉर्फोसिस महोत्सव हा ग्रामीण भागातील मुलांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणाचा विकास व्हावा, मुलाखतीला सामोरे जाताना घ्यावयाची काळजी तसेच संभाषण कौशल्य या विषयावर प्रा. डॉ. विनायक दळवी यांनी मार्गदर्शन केले. कॅप्टन श्रीमती नीलिमा प्रभू यांनी एनसीसी, एनएसएसची ध्येय, उद्दिष्टये व वैशिष्ट्यांबद्दल, तर डॉ. प्रदीप कामथेकर यांनी मेटामॉर्फोसिस म्हणजे काय, त्याचे महत्त्व व स्वरुप याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांचे सुरवंट न राहता त्यांचे फुलपाखरामध्ये रुपांतर व्हावे, त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांचा विकास व्हावा, यासाठी मुंबई विद्यापीठ गेली चार वर्षांपासून 'मेटामॉर्फोसिस' हा अभिनव उपक्रम राबवित आहोत, असे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच दीपक केसरकर विज्ञान महाविद्यालय दोडामार्गचे विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, तर आभार प्रा. एस. एन. जाधव यांनी केले. (वार्ताहर)